१२. शब्दकोश (स्थूलवाचन)

दैनंदिन जीवनात आपण सहजपणे अनेक नवीन शब्द वापरतो. हे शब्द अनेकदा आपल्या कानावर पडतात अथवा वाचनातून समजतात. संदर्भानुसार आपण त्यांचे अर्थ लावतो व त्यांचा उपयोग करायला शिकतो. प्रत्येक वेळी त्या शब्दांचा नेमका अर्थ किंवा अर्थच्छटा आपल्याला समजलेली असतेच असे नाही.

भाषिक समृद्धीसाठी शब्दाचा नेमका अर्थ माहीत करून घेणे अत्यंत आवश्यक असते, यासाठी शब्दकोश हे महत्त्वाचे साधन आहे.

यावर्षी आपण शब्दाकोशाची ओळख करून घेणार आहोत. नवीन शब्दांचे अर्थ आपण शब्दकोशात पाहू शकतो. हे शब्द शब्दकोशातून कसे शोधता येतात त्याचे मार्गदर्शन या पाठातून मिळते. नवीन शब्दांचे अर्थ तुम्ही शब्दकोशात पहायला शिकावेत, त्याची सवय तुम्हांला लागावी व शब्दांच्या अर्थाची मजा घेता यावी, या दृष्टीने या पाठाचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.



(शाळेच्या मधल्या सुट्टीमध्ये नेहा व सायली या दोन मैत्रिणींमधील हा संवाद)

नेहा : सायली, स्वातंत्र्यदिन-प्रजासत्ताक दिन या शब्दांमधील 'दिन' शब्दाचा अर्थ 'दिवस' असा आहे, हो ना गं?

सायली : हो....असाच आहे. का गं?

नेहा : अगं, मागच्या धड्यात हा शब्द आला होता, तेव्हा बाईंनी या शब्दाचा अर्थ सांगितला होता 'गरीब'!

सायली : दोन्ही शब्द नीट बघितलेस का तू? कसे लिहिले आहेत ते?

नेहा : आपण आता पुस्तकातच बघूया. शब्द कसा लिहिलाय ते....

सायली : हं. हा बघ मागचा धडा....आणि हा शब्द 'दीन'!

नेहा : अरे हो, तरी दोन्ही शब्द लिहिण्यात फरक आहे.

सायली : बरोबर! 'दीन' शब्दात 'दी' दीर्घ आहे. 'दीन' म्हणजे गरीब.
'दिन' शब्दात 'दि' ऱ्हस्व आहे. 'दिन' म्हणजे दिवस.

नेहा : शब्दांची किती गंमत आहे ना! अक्षरांत वरवर साम्य आहे; पण लेखनातल्या फरकामुळे अर्थात केवढा फरक!

सायली : आपण दोघीजणी असे नवीन शब्द आणि त्याचे विविध अर्थ रोज समजून घेऊया.

नेहा : अगं पण कसे? आपल्याला सारखे आपल्या बाईंकडे जावे लागेल अर्थ विचारायला!

सायली : अगं नाही. मला माहीत आहे त्याची गंमत. शब्दांचे अर्थ आपले आपण कसे शोधायचे ते मी तुला दाखवते.

सायली आणि नेहा यांच्याप्रमाणेच शब्दांचे अर्थ शोधण्याचा आनंद तुम्हीही घ्यायला हवा आहे. त्यासाठी तुम्ही या पाठातून शब्दकोश म्हणजे काय, त्याची रचना, तो कसा पाहावा याबाबत माहीत करून घेणार आहात.

शब्दकोश म्हणजे काय, त्याची उद्दिष्टे, तो कसा पाहावा हे आपण समजून घेऊया.



मुलांनो, ज्या एका अक्षराने किंवा अक्षरसमूहाने एखादी वस्तू, विचार, कल्पना, भाव, गुण किंवा क्रिया इत्यादींचा अर्थ व्यक्त केला जातो, त्या अक्षरास किंवा अक्षरसमूहास '**शब्द**' असे म्हणतात.

कोश म्हणजे 'संग्रह' तर शब्दकोश म्हणजे 'शब्दसंग्रह' होय. हा झाला शब्दकोश शब्दाचा वाच्यार्थ; पण विकसित भाषांत शब्दसंग्रह आणि शब्दकोश यांच्या स्वरूपात थोडा फरक असतो.

एखाद्या भाषेच्या विशिष्ट क्षेत्रातील मर्यादित शब्दांच्या संग्रहाला 'शब्दसंग्रह' (Glossary) असे म्हणतात; तर त्या भाषेतील बहुतेक सर्व शब्दांचा संग्रह, विशिष्ट रचनापद्धतीचा अवलंब करून दिला असल्यास त्याला '**शब्दकोश**' (Dictionary) असे म्हणतात.

कोशात समाविष्ट केलेल्या शब्दांची रचना पद्धतशीरपणे केलेली असते. संग्रहित केलेल्या शब्दांचा क्रम कोणत्या पद्धतीने लावला आहे ते कळले तर कोणताही शब्द कोठे सहजतेने सापडेल हे नक्की कळते.

अलीकडे सर्व भाषांतील कोशांतील शब्दांची योजना त्या भाषेच्या व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या लिपीतील वर्णांच्या क्रमाने केलेली असते. अशी योजना करताना शब्दांचे आद्य अक्षर किंवा वर्ण विचारात घेतलेला असतो. या पद्धतीमुळे कोशात शब्द कोठे सापडेल हे चटकन ठरवता येते.

उद्दिष्टे

(१) प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ असतो, हे कळणे.

(२) शब्दाचा योग्य अर्थ माहीत करून घेण्याची सवय लागणे.

(३) शब्दाच्या अर्थाच्या छटा समजणे.

(४) 'शब्दकोश' ही संकल्पना समजणे.

(५) शब्दकोशाची गरज व महत्त्व लक्षात येणे.


(६) शब्दकोश हाताळता येणे.

काय असते शब्दकोशात–

(१) शब्दांचा संग्रह
(२) शब्दांचे प्रमाण उच्चार
(३) व्युत्पत्ती
(४) समानार्थी प्रतिशब्द
(५) संदर्भानुसार बदलणारे शब्दांचे अर्थ
(६) अर्थाचे स्पष्टीकरण करणारे वर्णन किंवा चित्र
(७) प्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथातील संदर्भ

शब्दकोश कसा पाहावा ?

शब्दकोश पाहण्याचा क्रम :



शब्दकोशात एखादा शब्द शोधताना 'अकारविल्हे' म्हणजे 'अ' या अक्षरापासून लावलेला क्रम महत्त्वाचा असतो. आपण वि. भा. नेमाडे यांच्या 'नव्या युगाचे गाणे' या कवितेतील एका ओळीचे उदाहरण पाहूया.

''अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती' विज्ञानाचा प्रकाश आला घडे दिव्य क्रांती'' आता समजा, आपल्याला 'अणूरेणूतुनि', 'प्रगटति', 'विज्ञान', 'प्रकाश', 'दिव्य' आणि 'क्रांती' असे सहा शब्द शोधायचे आहेत.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे शब्दांना लागलेले प्रत्यय वगळून, सामान्यरूप वगळून मूळचा शब्दच शोधायचा असतो. 'अणूरेणूतुनि' या शब्दातला–तुनि हा प्रत्यय वगळून मूळ शब्द शोधावा लागेल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे क्रियापदाचा मूळ धातू शोधायचा असतो, म्हणजे 'प्रगटति' या शब्दाचा 'प्रकट' हा मूळ धातू आपल्याला शोधावा लागेल. '**अणूरेणू**', '**प्रकट**', '**विज्ञान**', '**प्रकाश**', '**दिव्य**', '**क्रांती**' या सहा शब्दांचा आता आपण क्रम लावू. आपल्या वर्णमालेनुसार यांची पहिली अक्षरे कुठल्या क्रमाने येतात ते पाहू.

आता अर्थातच स्वरापासून सुरू होणाऱ्या शब्दांचा क्रम आधी लागेल. म्हणजे इथे 'अणूरेणू' हा शब्द आधी येईल. त्याचा पहिला क्रमांक, यानंतर उरलेल्या पाचपैकी कुठलं अक्षर आधी येईल ?

यात साहजिकच स्वरानंतर येणारे पहिले व्यंजन 'क', म्हणजे दुसऱ्या क्रमांकाला येईल 'क्रांती'. नंतर क्रम येईल 'दिव्य' मधील 'द' चा. मग येतील प्रकट आणि प्रकाश हे शब्द. सर्वांत शेवटी येईल विज्ञान.

आता 'प्रकट' आणि 'प्रकाश' यांत 'प्र' नंतर कुठली अक्षरे येतात ? तर 'क' आणि 'का' आता तुम्हीच सांगा. 'क' आणि 'का' यापैकी कोणाचा क्रम आधी लागेल. अर्थात 'क' चा. म्हणून 'प्रकट' आधी येईल आणि 'प्रकाश' नंतर. मग

आता आपला क्रम तयार झाला. 'अणूरेणू', 'क्रांती', 'दिव्य', 'प्रकट', 'प्रकाश', 'विज्ञान' आहे ना सोपे?

यात 'क्रांती', 'प्रकट', 'प्रकाश' यांमध्ये पहिले अक्षर जोडाक्षर आहे. ते कसे शोधायचे? तर 'अ' पासून 'औ' पर्यंतचे शब्द संपले, की जोडाक्षरे सुरू होतात; म्हणजे 'क' पासून 'कौ' पर्यंतचे शब्द संपले, की जोडाक्षरे सुरू होतील. त्यात क्+र=क्र शोधायचा, मग क्रा शोधायचा, त्यावर अनुस्वार असलेले शब्द शोधायचे. तेव्हा आपल्याला 'क्रांती' सापडेल. आता तुम्ही स्वत: शब्दकोशात शब्द पाहायचा सराव करा.

टीप : 'क्ष', 'ज्ञ' यांचा क्रम अकारविल्हे लावताना 'ळ' या शेवटच्या व्यंजनानंतर येतो.

शब्दकोश पाहण्याची, हाताळण्याची सवय लागली, की शब्दाचे अर्थ व मोल तुम्हांला कळेल. योग्य जागी योग्य अर्थाचा शब्द तुम्ही वापरू शकाल. समर्पक शब्दमांडणीच्या प्रवासात शब्दकोश हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. या साधनाचे महत्त्व जाणा. तुम्ही आता उच्च प्राथमिक गटात आहात. भाषिक समृद्धीच्या वाटचालीत शब्दकोशाचे महत्त्व जाणावे, यासाठी या पाठाचा अभ्यास करणे योग्य ठरेल.



स्वाध्याय

प्र. १. नम्रता, अंबर, आलोक, वरद, वनिता, समीर, शर्वरी, शेखर, समिरा, मानसी, माधवी हे शब्द 'अकारविल्हे' प्रमाणे लावा.

प्र. २. तुम्हांला पाठातील एखाद्या शब्दाचा अर्थ शोधायचा असेल तर यापुढे तुम्ही तो कसा शोधाल? सोदाहरण सांगा.

प्र. ३. शब्दकोशाचा तुम्हांला कळलेला उपयोग तुमच्या शब्दांत सांगा.

प्र. ४. शब्दकोशासंबंधी खालील मुद्द्यांना धरून परिच्छेद तयार करा.

शब्दकोशाचा उपयोग

शब्दकोश पाहण्याची उद्दिष्टे

❁❁❁

P873XB